महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
website : www.mahadiscom.in
email : managerpom@mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - ६९४२५१४१

**दिनांक: ०२/०४/२०२४**

क्र. मासंवि/रवका/न.क्र.११/ **१०३६०**

**प्रति,**
सर्व विभाग प्रमुख,
म.रा.वि.वि.कं.मर्या.,
सांघिक कार्यालय, मुंबई.

**विषय:** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ संबंधित आदर्श आचारसंहितेचे पालन करणेबाबत.

**संदर्भ:** पत्र क्र. नि. मुंउजि/ का-५/ आचार संहिता / जा क्र.५१५/ २०२४ दि.१६.०३.२०२४.

------

भारत निवडणूक आयोगाने दि. १६ मार्च २०२४ च्या प्रसिध्दिपत्रकाव्दारे भारतातील विविध राज्यांमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. सदर निवडणुक महाराष्ट्र राज्यात पाच टप्प्यात होणार आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई यांचे पत्र क्र. नि. मुंउजि/ का-५/ आचार संहिता / जा क्र.५१५/ २०२४ दि.१६.०३.२०२४ अन्वये मुंबई उपनगर जिल्हात आदर्श आचारसंहितेचे योग्यरित्या प्रभावी अमंलबजावणी करणेकरिता मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. या संदर्भातील जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई यांचे पत्र दि.१६.०३.२०२४ सोबत जोडण्यात येत आहेत.

२. सबब, सक्षम अधिकारी यांच्या आदेशानुसार सर्व संबंधितांनी उपरोक्त संदर्भिय पत्रामध्ये प्रसृत केलेल्या सूचनांचे अवलोकन करुन लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ करीता आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच, सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाशी संबंधित सूचनांनुसार कामाची माहिती व कार्यवाहीचा तपशील परस्पर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना सादर करावा.

**सोबत:** वरीलप्रमाणे

( भूषण कुलकर्णी )
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत सविनय सादर:**
संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**
१) मुख्य विधी अधिकारी/मुख्य तपास अधिकारी ,म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय, भांडुप.

C:\Users\ADMIN\Desktop\Loksabha Election guidelines for Mumbai Surburbs_०१०४२०२४.docx

DIR HR (R-012076/2024)

T-597
2-4-2024

Received Tapal on Dated 01-4-24

# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
ई-मेल-deomsd२३@gmail.com

क्रमांक नि.मुंउजि/का-५/आचार संहिता/जा.क्र५१५ /२०२४

प्रति,

दिनांक:- १९/०३/२०२४

02/04/24

१) मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका
२) मा.मुख्य महानगर आयुक्त,मुंबई महानगर प्रदेश विकास आणि प्राधिकारण
३) मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकारण
४) मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
५) मा.अध्यक्ष तथा महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ वीज वितरण कंपनी
६) उपाध्यक्ष तथा महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, धारावी पुर्नविकास प्रकल्प
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
११) अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभागृ मुंबई उपनगर
१२) महाव्यवस्थापक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण
१३) व्यवस्थापकीय संचालक, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव पूर्व, मुंबई.

CMD ✓
27/3/24
All Directors

| OFFICE OF CMD, MSEDCL | | | | |
|---|---|---|---|---|
| DIR-FIN | DIR-OP | DIR-COM | DIR-PROJ | DIR-I |
| ED-FIN | ED-DIST | ED-COM | ED-PROJ | ED-H |
| ED-BR | ED-SE | ED-INFRA | CGM-IT | CLA |
| CS | FOR NECESSARY ACTION PLEASE | | | CE-DIS |

विषय :- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४
आदर्श आचार संहिता.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता आदर्श आचार संहिता मा. भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक १६ मार्च २०२४ रोजीच्या घोषणेनुसार लागू झालेली आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करणे करीता खालील नमूद सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) आपल्या कार्यालयाच्या मालकीची/ताब्यातील/भाडेकरारावर असलेली वाहने, विश्रामगृह, इमारती, मोकळी जागा इत्यादी मालमत्तेचा निवडणूक प्रक्रीयेसाठी गैरवापर होणार नाही तसेच राजकीय जाहिरातींमुळे मालमलत्तेचे विद्रुपीकरण होणार नाही याची दक्षता घ्यावी
२) आदर्श आचार संहितेच्या कालावधीत आपल्या विभागाने साध्य केलेल्या उदिष्टांची/पूर्ण केलेल्या प्रकल्पांची जाहिरात/प्रचार करु नये.
३) आदर्श आचार संहितेच्या कालावधीत आपल्या कार्यालयाच्या Website वर राजकीय नेत्यांचे फोटो असू नयेत.
४) आपल्या विभागामार्फत करण्यात येणाऱ्या विविध कामांच्या बाबत आदर्श आचारसंहितेत नमूद संबंधित निर्देश विचारात घेऊन त्यानुसारच पुढील कार्यवाही करावी.
५) आपल्या विभागाच्या स्तरावर दि.१६-०३-२०२४ रोजी प्रत्यक्षात सुरु असलेल्या विकासकामांची यादी व दि.१६-०३-२०२४ रोजी मंजुरीच्या विविध टप्प्यावर असलेली परंतु प्रत्यक्षात सुरु न झालेल्या कामाची यादी सादर करावी.

CGM(HR)
Pl. circulate

21 MAR 2024

(राजेंद्र क्षीरसागर)
जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

म.नों.क. येथे दिनांक..................रोजी पत्र मिळाले

GM HRMS
Urgent as directed

AGM -O&M
Sr. Mgr. (S/C)
Sr. Mgr. (HRMS)